# प्रकरण पहिले

## जोतिराव फुले - चरित्र आणि कार्य

## प्रकरण - पहिले -

### जोतिराव फुले - चरित्र - कार्य --

एकोणिसाव्या शतकातील समाज-सुधारकांपैकी ध्येयप्राप्तीसाठी प्राणप्रणाला लावून सर्वस्वाचा त्याग करणारी अग्रगण्य व्यक्तिरेखा ' जोतिराव फुले ' होय. एक उपेक्षित समाजसुधारक म्हणून त्यांचा उल्लेख केला जातो. हा त्यांचा व त्यांच्या कर्तृत्वाचा दैवदुर्विलास होय. याला तत्कालीन सामाजिक व राजकीय परिस्थितीच कारणीभूत ठरते. एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धातील पेशवाई म्हणजे महाराष्ट्रातील संस्कृतीस लावलेला जणू सुरुंग होता. सर्व समाजाचे नैतिक अध:पतन झाले होते. जातिभेद, स्वार्थ, स्वैराचार, भ्रष्टाचार, अन्याय, मोंदूगिरी, भटशाही यासारख्या प्रवृत्तीमुळे सर्व समाजच पोखरला होता. समाजातील पुरोहित वर्ग बलाढ्य बनला होता. राजे लोकांनाही त्यांच्यासमोर नतमस्तक व्हावे लागत होते. ' हिंदवी स्वराज्याचे संस्थापक गो - ब्राह्मण प्रतिपालक शिवप्रभू यांना राज्यरोहण प्रसंगी याच सुशिक्षित उच्चवर्णीयांनी अडवून एक कोटी चाळीस लक्ष ' होन ' उकळले. सातान्याचे राणाप्रताप यांनाच बळी पडले. शाहू महाराजांनाही शह देण्याचा प्रयत्न याच कर्मठांनी केला.[1]

पुरोहित वर्गाने प्राचीन काळापासून सर्व समाजाला अज्ञानाच्या सागरात बुडवले होते. ईश्वरावतारी ज्ञानेश्वरांचा त्यांनी छळ केला. निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान,मुक्ताबाई यांना पुरोहितवर्गाने वाळीत टाकले. त्यांना त्रासून विठ्ठलपंत व रखुमाईने त्रिवेणीत देह टाकून जलसमाधी घेतली. तुकारामाचा ग्रंथ याच कर्मठांनी बुडविला.स्वामी दयानंद सरस्वतीच्या फोटोची गाढवावरुन धिंड याच वर्णीयांनी काढली. फुल्यांवरील दगडफेक या सर्वांमागे उच्चवर्णीयांचा हात होता. सर्व समाजात विषारी सर्पाप्रमाणे पुरोहितशाही आपल्या वर्चस्वाचे विषारी गरळ ओकत होती. समाजातील स्त्री-शूद्रांदींना अज्ञानाच्या अंधारातच चाचपडत रहावे असे पुरोहितवर्गास वाटत होते. शिक्षण क्षेत्रातील मक्तेदारी उच्चवर्णीयांकडे असल्याने सामान्य समाज शिक्षणापासून वंचित राहिला. धर्मग्रंथ आणि सोवळ्या ओवळ्याचे अवडंबर माजवून, स्वत:स भूदेव मानून पुरोहितवर्गाने सर्व सामान्यास लुबाडले.

पेशवाईकडून ब्राह्मणांना चांगली वागणूक मिळू लागली. चांगल्या हुद्दयावर पुरोहितवर्ग दिमाखाने डुलू लागला. विद्या असो नसो ब्राह्मणांसाठी जेवण व दक्षिणा याची भरपूर तरतूद सरकारने केली. त्यामुळे अर्थातच पुणे शहर ब्राह्मण अधिका-यांचे जंगी केंद्रच बनले. तीस ते चाळीस हजार ब्राह्मण ओळीने कित्येक दिवस पक्वान्नाची भोजने झोडीत रहात. त्यामुळे एकोणिसाव्या शतकाच्या सुरूवातीला ब्राह्मणांचे वर्चस्व पराकोटीला पोहोचले. पर्वतीच्या पायथ्याशी या ब्राह्मणांना दक्षिणेच्या स्वरुपात हजारो रूपये वाटले जात होते. " ही दक्षिणा प्रथम"राष्ट्रकूट " घराण्याच्या वेळेस चालू असावी. कालांतराने त्याचे प्रस्थ वाढत गेले असल्याचे आढळते. "[२]

रावबाजीच्या पेशवाईत जरी गोविंदराव फुल्यांना मानसन्मान मिळाला तरी पेशव्यांची हीन दर्जाची कुजकी नीतिमत्ता त्यांना पसंत नव्हती. अनेकदा हा पेशवा बदफैली स्त्रियांच्या घोळक्यात वावरत असे. " त्यांच्या राजवटीत एका ब्राह्मणबाईने म्हणे बुधवारवाडयापासून विश्रामबाग वाडयापर्यंत भरदिवसा रस्त्याने विवस्त्रावस्थेत चालून दाखवून पैज जिंकली होती. "[३] यासारख्या घटनातून तत्कालीन समाजाची ढासळलेली नीतिमूल्ये जाणवतात. शाक्तपंथी ब्राह्मणांनी पुजेच्या नावाखाली घातलेला नंगानाच विवस्त्रावस्थेमध्ये केलेली देवपूजा आणि समाजाची केलेली फसवणूक यातून तत्कालीन समाजाचे चित्र डोळयासमोर उभे राहते. दुराचारी पराक्रमहीन रावबाजीच्या पेशवाईने धुमाकूळ घातला होता. कुणाचा पायपोस कुणाच्या पायात नव्हता. पेशवाईतील अराजक व बेबंदशाहीचा नेमका फायदा इंग्रजांनी घेतला. पराक्रमहीन रावबाजीची पेशवाई लयास गेली. या भयंकर स्थित्यंतरामुळे पेशव्यांच्या सत्तेवर अवलंबून असलेल्या शेकडो कुटुंबांची दयनीय अवस्था झाली. शनिवार वाडयावर इंग्रजांचा " युनियन जॅक " फडकला. पेशवाई संपून इंग्रजांची जुलमी राजवट सुरु झाली.

पुरोहितवर्गाने राजकीय परिस्थितीचा आढावा घेतला. संस्कृत भाषेचा नाद सोडून भराभर इंग्रजी भाषेचा अभ्यास केला. अर्थातच इंग्रजांनी ब्राह्मण समाजावर " बुध्दिवादी समाज " म्हणून शिक्कामोर्तब केले. त्यांना समाजात

सन्मानाने वागवण्यात आले. उच्च अधिका-यांच्या जागेसाठी ब्राह्मण समाजाची नेमणूक होऊ लागली. स्त्री-शूद्रांवर वाट्टेल तसा अन्याय व अत्याचार होऊ लागला. सर्वसामान्य लोक भरडून निघाले. शेतक-यांवर प्रामुख्याने खूप अन्याय होऊ लागला. शेतसारा, विविध खंडण्या, कर वसूल करण्यात आला. पुरोहितशाहीने इंग्रजांकडे चाकरी करुन इंग्रजांच्या हुकुमशाहीस खतपाणी घातले.

इंग्रजांनी सर्व लोकांवर आपली दहशत बसवली. आपल्या सत्तेला बळकटी येण्यासाठी येथील लोकांची मने जिंकण्याचे कार्य त्यांनी हाती घेतले. सर्वप्रथम पेशवाईतील मानवास दिल्या जाणा-या अमानवी शिक्षा रद्द केल्या. पेशवाईत गुन्हेगारांना गुन्हयांच्या स्वरुपावरुन सुळावर देणे, उलटे टांगून रक्त गळेपर्यंत फटकारे देणे, हत्तीच्या पायाखाली तुडविणे, तोंडात शेंदूर, तप्त रस ओतणे, कडेलोट करणे यासारख्या शिक्षा दिल्या जात. त्या सर्व इंग्रजांनी कायद्यातून वगळल्या. सर्वत्र पाश्चात्य विद्या आणि औद्योगिक सुधारणेस प्रारंभ केला. गोरगरीबांना अनाथालयामध्ये आश्रय देण्यात आला. या सर्व परिस्थितीचा परिणाम जनतेवर झाला. अर्थातच सामान्य लोकांच्या मनात इंग्रजी सत्तेबाबत आदर निर्माण झाला. त्यामुळे ब-याच लोकांनी ब्रिटिश राजवटीचे स्वागतच केले होते. इंग्रजांच्या जुलूम अत्याचार अन्यायाला ठराविक मर्यादा होत्या. सुधारलेल्या इंग्रजी राज्यात अंधश्रध्दा, दारिद्र्य, जातिभेद या गोष्टी तशाच टिकून राहिल्या होत्या. समाजात शतकानुशतके चालत आलेले काही दोष बळावतच होते. स्त्रीवर्गावरील अन्याय वाढतच होता. ब्राह्मण समाजाने या कालखंडातही धर्माच्या पडदयाआड गुलामगिरी चालवली होती. पण ब-याच लोकांना या गुलामगिरीची जाणीव झालेली नव्हती. ज्यांना स्वत:वर लादलेली गुलामगिरी समजत नाही ते गुलामगिरीतून कधीही मुक्त होऊ शकत नाहीत. ब्रिटिशांची राजसत्ता या देशात स्थापन झाल्यावर तेथील लोकांमध्ये धार्मिक परिवर्तन घडवण्यासाठी ब्रिटिश राजकर्त्यांनी आणि ख्रिश्चन मिशन-यांनी खूप प्रयत्न केले. लोकांच्या मनावर पडलेला हिंदु-धर्माचा प्रभाव कमी करुन ख्रिस्ती धर्मप्रसारास मोठया प्रमाणावर सुरुवात केली. ख्रिश्चन मिशन-यांनी ठिकठिकाणी

आपली मिशने उघडली, तेथे गोरगरिबांना आश्रय देऊन धर्मांतर घडवण्यास प्रारंभ केला. त्यासाठी शाळा, अनाथालये, इस्पितळे इत्यादी संस्था स्थापन केल्या. पण हिंदु-धर्माशी एकनिष्ठ असणाऱ्या ब्राह्मण समाजाने ख्रिश्चन मिशनऱ्यांचा हेतू हाणून पाडला. ब्राह्मण समाजाचा या चळवळीस कठोर विरोध होता.

पुरोहितवर्गाने शेकडो देवता, शकुनअपशकुन विधिनिषेध, व्रतवैकल्ये, प्रायश्चिते, मुहूर्त ग्रहपिडा-परिहार इ. प्रकारचा ढोंगधतुरा समाजात सुरु ठेऊन स्वतःचे प्रस्थ कायम राखले. ब्राह्मणाशिवाय केलेले अध्यापन अथवा अध्ययन पाप समजले जाऊ लागले. समाजातील उच्चवर्णीयांशिवाय सर्व थरातील जातीवर्गांना ब्रिटिशकालीन गुलामगिरीच्या झळांचे दाहक चटके बसले होते. संघटीतपणे एकत्र येऊन गुलामगिरीविरुध्द बंड पुकारणे एवढाच एक पर्याय होता. त्यासाठी समाज जागृतीची अत्यावश्यकता होती. देशाला धाडशी व त्यागी समाजसुधारकांची गरज होती. जो समाज स्वार्थापोटी इंग्रजास वश होऊन शेतकऱ्यांवर अन्याय करीत होता, त्याच ब्राह्मण समाजातील " लोकहितवादी " सारखे समाजसुधारक पुरोहितशाहीवर कडाडून हल्ला करीत होते. विलक्षण कोंडीत सापडलेल्या समाजास मुक्त करण्यासाठी सर्वस्व पणाला लाऊन निर्धाराने व धैर्याने समाज प्रबोधन करणाऱ्या नेतृत्वसंपन्न सुधारकांची गरज होती. बाळशास्त्री जांभेकर, भाऊ महाजन, लोकहितवादी, विष्णुबुवा ब्रह्मचारी, न्या. रानडे, दादोबा पांडुरंग, जोतिराव फुले यासारखे आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार उदयास आले. जगन्नाथ शंकरशेठ हे तर एल्फिंस्टनबरोबर मुत्सद्दीपणे चर्चा करुन समाजसुधारणा घडवून आणणारे कर्ते सुधारक होते. विष्णूशास्त्री चिपळूणकर अथवा न्या. रानडेसारखे ते बोलके सुधारक नव्हते. रानडेंच्या उक्ती आणि कृतीमध्ये फरक होता. महाराष्ट्रामध्ये याच दरम्यान तीन वेगवेगळे प्रवाह पहावयास मिळतात. [१] धार्मिक सुधारणेचा प्रवाह, - यामध्ये प्रार्थना व ब्राह्मो समाजाचा समावेश होतो. यात रानडे, भांडारकर आदी मंडळी अग्रणी होते.
[२] बुध्दिप्रामाण्यावर आधारलेला, पांढरपेशा उच्चवर्णीयांच्या सुधारणेचा विचार करणारा प्रवाह - यात आगरकर अग्रणी होते. [३] ब्राह्मणी संस्कृतीच्या

विरुध्द बंड करणारा प्रवाह - यात जोतिराव फुले अग्रणी होते. हिंदुधर्मातच सुधारणा केल्याशिवाय सामाजिक सुधारणा करणे अशक्य आहे याची जाणीव झाल्याने जोतिरावांनी धार्मिक सुधारणेस प्रारंभ केला. मुंबईतील विद्वान युरोपीयन व ख्रिश्चन मिशनरी यांच्या सहवासामुळे आणि सहकार्यामुळे जोतिरावांच्या विचारांना चांगलीच प्रेरणा मिळाली. तत्कालीन समाजाचे दोष फुल्यांनी जाणून घेतले. त्यांच्या धमन्यांतील रक्तास पूर्वजांपासून प्रेरणा मिळाली होती. जोतिरावांच्या पूर्वजांना पेशवाई व आंग्लाईमध्ये अनंत यातना सहन कराव्या लागल्या होत्या. खडतर जीवन,असह्य वेदना सहन करीत, वेळप्रसंगी अन्यायास विरोध करीत. जोतिरावांच्या घराण्याची परंपरा स्वत:चे अस्तित्व टिकवून होती.

## जोतिराव फुले - परंपरा :

सातारा-या जवळील " कटगुण " हे जोतिराव फुले यांचे मूळ गाव. त्यांचे मूळचे आडनाव " गो-हे " होते. जोतिरावांचे पणजोबा " मोडेल पण वाकणार नाही " या वृत्तीचे पण विवेकी सद्गृहस्थ होते. त्यांचे घराणे क्षत्रिय माळी जातीचे. पूर्वी संपूर्ण गावचा कारभार गावकामगार पाटील व कुलकर्णी यांचेकडे असे. जोतिरावांचे पणजोबा कुलकर्णीच्या हाताखाली दप्तरांची ने-आण करणे, त्याचप्रमाणे गावकामगार पाटील व कुलकर्णी सांगतील त्याप्रमाणे शेतक-यांकडून शेतसारा वसूल करणारा प्रामाणिक सेवक होता. आपली पोटापुरती असणारी नोकरी तो इमानी-इतबारे चोख बजावित होता. सारा वसुलीतील कुलकर्ण्यांची दंडेलशाही, अप्रामाणिकपणा जोतिरावांच्या पणजोबांना सतत सलत होता. एक दिवस त्यांच्यात व कुलकर्णी यांच्यामध्ये बोलाचाली झाली. हा कुलकर्णी "ब्राह्मण" त्यामुळे जोतिरावांच्या पणजोबांकडे नेहमीच सूड भावनेने पाहू लागला. वेळोवेळी त्यांचा अपमान केला जाई. कुलकर्ण्यांमुळे त्यांना मानाने जीवन जगणे अशक्य झाले. गो-हेंना अवमानीत जीवन जगणे मान्य नव्हते. कुलकर्ण्यांकडे लाचारीचे जीवन जगण्यापेक्षा दुसरा व्यवसाय करावा या उद्देशाने भ्रष्टाचारी, कर्मठ कुलकर्ण्यांचा त्यांनी त्याग

केलाच शिवाय कटगुणाला सुध्दा रामराम ठोकला. पुढे ते "पुरंदर" तालुक्यातील "खानवडी" या छोटयाशा खेडयात स्थायीक झाले. पणजोबांच्या धमण्या-धमण्यातून सळसळणा-या रक्तातील कणखर स्वाभिमानी वृत्ती "शेटीबा" पासून थेट जोतिरावांपर्यंत संचारली. "शेटीबा" हे जोतिरावांचे आजोबा. राणोजी, कृष्णा व गोविंदा हे शेटीबांचे तीन सुपुत्र. वडिलांच्या दैन्यावस्थेमुळेच कोवळया वयात या मुलांना वणवण भटकावे लागले. जोतिरावांचे वडील गोविंदराव त्याच गावातील एका सावकाराचे घरी शेळयामेंढया चारून आणण्याचे काम करीत होते. त्याच सावकाराचा फुलांचा धंदा होता. गोविंदरावाचा प्रामाणिकपणा पाहून सावकाराने त्यास फुलांचे हार-गुच्छ इ. वस्तू बनविण्यासाठी फुलांच्या व्यवसायात समाविष्ट करून घेतले. त्यांची कार्यकुशलता सावकाराच्या नजरेत भरली. त्यांच्या कार्यकुशलतेचा लौकिक पेशव्यांच्या कानावर गेला. पेशव्यांनी त्यांना फुलांच्या गाद्या, चद्या, उशा, हार, गुच्छ इ. वस्तू बनविण्यासाठी आपल्या पदरी ठेवले. त्यांच्या गोड सुवासिक सेवेबद्दल खूष होऊन पेशव्यांनी त्यांना पस्तीस एकर जमीन इनाम म्हणून दिली. गोविंदरावांच्या कार्यकुशलतेबाबत मिळालेल्या बक्षिसाची वार्ता सर्वत्र पसरली. लोक गोविंदरावांच्या "गो-हे" घराण्याचा उल्लेख "फुले" या नांवानी करु लागले. गोविंदरावाना समाजात मानसन्मान मिळत असला तरी समाजाचे झालेले नैतिक अध:पतन त्यांच्या अंत:करणास कुरतडत होते, सलत होते. त्यांचे सदाचारी, विवेकी मन बैचैन होते. पण तत्कालीन पेशवाईच्या बेबंदशाही व अराजकतेच्या प्रचंड प्रवाहाविरुध्द आपण जाऊ शकणार नाही याची त्यांना खात्री होती. ब्रिटिश राजवटीमुळे पेशव्यांच्या सत्तेवर अवलंबून असणा-या शेकडो कुटुंबांची दयनीय अवस्था झाली. या वातावरणात फुले कुटुंबही होरपळले गेले. उदरनिर्वाहासाठी पुन्हा त्यांना अहोरात्र झगडावे लागले.

गोविंदरावांनी आपल्या सामर्थ्यावर आणि कर्तृत्वावर भाजीपाल्याचे एक दुकान घातले. दरम्यान पुण्याजवळील "धनकवडी" गावातील "झगडे पाटील" यांच्या "चिमणा" नावाच्या माळी जातील मुलीशी विवाह केला. गोविंदरावानी मराठेशाहीच्या पडत्या काळातील अनेक घटना पाहिल्या होत्या, ब्राह्मणांचा

कर्मठपणा अनेक घटनांतून दिसतच होता. विशेषत: ब्राह्मणांनी शूद्रांना खूपच छळले म्हणून जोतिराव म्हणतात -

ब्राह्मणाची जात कृत्रिमी अखंड ।
छळीले उदंड ।। शूद्रदिंका ।। [५]

पुरोहितशाहीचा शूद्रांवरील हा अनन्वित छळ राजरोसपणे चालू होता. शेतक-यांना आणि शेतमजूरांना अधिकारी लोक अकारण छळत होते. त्यांच्याकडून मागेल तेवढा शेतसारा न मिळाल्यास तापलेल्या तव्यावर उभे करणे, मिरचीची धुरी देणे, त्यांच्या स्त्रियांवर अत्याचार करणे अशाप्रकारचे शासन दिले जात असे. अनेकप्रकारे शेतक-यांची लुबाडणूक केली जात असे म्हणून जोतिराव म्हणतात -

शूद्रास निंदून त्यांचे सर्व खाती ।।
त्यांच्याशी वागती ।। सोवळ्याने ।।
निंदकाचे घर ब्राह्मणी सोहळा ।।
खरा हा वाटोळा ।। जोती म्हणे ।।

समाजातील दीन दलितांवरील अन्याय पाहून सुध्दा नाईलाजास्तव गोविंदराव तिकडे दुर्लक्ष करीत होते. कारण पुरोहितशाही व अधिकारशाही यांच्या अन्यायी प्रवाहाविरुध्द जाणे धोक्याचे होते. याच प्रतिकूल परिस्थितीमध्ये इ.सन १८२७ च्या सुप्रभाती चिमणाबाईने एका तेज:पुंज बालकास जन्म दिला.

जोतिरावांची बाल्यावस्था व संस्कार -
---

जोतिरावांचे बालपण खूपच हालअपेष्टात गेले. त्यांच्या बालवयातच मातोश्री निवर्तली. जोतिराव आणि त्यांचे बंधू 'राजाराम' पोरके झाले. त्यांच्या संगोपनाचा जटील प्रश्न गोविंदरावांसमोर उभा राहिला. सर्व घरात दु:खाची छाया पसरली. गोविंदरावांना पुनर्विवाह करण्याशिवाय पर्याय नव्हता. पण त्यांच्या डोक्यात तो विचारसुध्दा आला नाही. मुलांच्या संगोपनाची सर्व जबाबदारी सगुणाबाईकडे सोपविली. मातेप्रमाणे त्यांनी जोतिरावांचे पालनपोषण केले.

वयाच्या सहाव्या वर्षापासून जोतिरावांना शाळेत पाठविणेबाबत विचारविनिमय सुरु झाला. शिक्षणक्षेत्रात उच्चवर्णीयांनी बरेच स्तोंभ माजवले होते. शिक्षण म्हणजे केवळ ब्राह्मणांची मक्तेदारीच होती. कनिष्ट वर्गातील लोकांना शिक्षण घेण्याचा अधिकार नव्हता. अध्यापनाचे विषय संस्कृत, वैदयकशास्त्र, धर्मशास्त्र, जोतिषशास्त्र, वेदांत, न्याय, व्याकरण इ. होते. त्याचप्रमाणे अंकगणित, इतिहास, भूगोल या विषयांचाही समावेश होता. जोतिरावांना वयाच्या सहाव्या वर्षी एका गावठी शाळेत पाठविण्यात आले. त्यांना स्वाभाविकच विद्येची गोडी लागली. याच दरम्यान ख्रिस्ती मिशन-यांनी अनेक ठिकाणी प्राथमिक शाळा उघडून " सर्व धर्म समभाव " हे तत्व राबविण्याचा प्रयत्न केला होता. त्यांच्या शाळेत सर्व जातीधर्माच्या मुलांना प्रवेश दिला जात होता. कर्मठ ब्राह्मणांना मात्र ही शिक्षणाची पध्दत मान्य नव्हती. शुद्र-कनिष्ठ जातीच्या मुलांनी शिक्षण घेणे पाप समजले जात होते. त्यामुळे बाटा-बाटीची त्यांना भीती वाटे. या संबंधी १९ आक्टोबर १८५४ च्या ज्ञान प्रकाशामध्ये या शिक्षणपध्दतीबाबत चिंता व्यक्त करताना एक उच्चवर्णीय म्हणतो -

गत तरी आता काय करावी ।।
आवरुनी पोरे कैशी धरावी ।।
जाऊ देता त्यांच्या शाळे ।।
बाटूनि येतील तुमची बाळे ।।
सर्व कुळाला लागेल काळे ।। [६]
खात्री ऐशी पक्की धरावी ।।

जोतिराव फुले नियमित शाळेत जात होते. त्यांनी आपला प्राथमिक शाळेतील अभ्यास पूर्ण केला. आता त्यांना चांगले लिहिता वाचता येत होते. याच दरम्यान गोविंदरावांच्या दुकानातील एका ब्राह्मण कारकुनाने जोतिरावांना शाळेतून काढण्याबाबत सांगितले. अर्थात या पाठीमागे त्या ब्राह्मणांचा स्वार्थ होता. गोविंदरावानी केवळ ब्राह्मणांच्या सल्ल्यावरुन जोतिरावांना शाळेतून काढण्याचे ठरविले. तत्कालीन रीतीरिवाजाप्रमाणे जोतिरावांचा

बालविवाह " फाल्गुन वद्य " पंचमी शके १७६२ इ.स. १८४० " या शुभमुहूर्तावर संपन्न झाला. जोतिरावांना प्रपंचाचा नेमका अर्थच समजला नव्हता. अर्थातच प्रपंचाच्या मांडामांडीत ते गुंतले नव्हते. मात्र मोकळ्या वेळेत ते खूप वाचन करीत. त्यांची व्यासंगी वृत्ती प्रकर्षाने जाणवत होती. " जोतिरावांच्या शेजारी राहणारे गफ्फार, बेगमुनशी व लिजीटसाहेब या धर्मोपदेशकांनी जोतिरावांना शिक्षणाचे महत्व पटवून सांगितले. [7] " गोविंदरावांनाही समजावून सांगून जोतिरावांना पुन्हा शाळेत पाठविण्याबाबत यश मिळविले. अभ्यासू आणि व्यासंगी जोतिरांवाना अनेक मित्र लाभले. शिक्षकवर्गामध्ये त्यांची वहावा होऊ लागली. याच दरम्यान त्यांना अनेक वीरपुरुषांची चरित्रे वाचण्यास मिळाली. प्रामुख्याने 'शिवाजी' आणि 'वॉशिंग्टन' यांची चरित्रे त्यांनी अभ्यासली होती. त्यातूनच त्यांना स्वदेशप्रेमाची जाणीव झाली. याच दरम्यान त्यांच्या मनात एक विचारक्रांती निर्माण झाली.

जोतिरावांच्या विद्यार्थीदशेत महाराष्ट्रामध्ये ब्रिटिश सत्तेविरुध्द वारंवार लहानमोठे बंड होत असे. त्या बंडामध्ये अनेक देशभक्त धारातीर्थी पडल्याचे जोतिरावांनी पाहिले होते. पण इंग्रजांचे राज्य आज ना उद्या लयास जाणार याची खात्री जोतिरावांना होती. त्याचबरोबर इंग्रजी राजवट सामाजिक सुधारणेला पोषक असल्याचा विश्वासही होता. तरीही मित्रांच्या सहाय्याने ब्रिटिशांचे राज्य उलथून पाडण्याचे मनोरथ जोतिरांवानी रचले. [8] देशबांधवांचा उद्धार करण्यासाठी आपले जीवन व्यतीत करण्याचा संकल्प सोडला. आपले शरीर कमविण्याचा निर्धार त्यांनी केला. याच दरम्यान त्यांना लष्करातील निवृत्त पण लढवय्या लहुजीबुवा मांग भेटला. त्यांच्याकडून जोतिरावांनी दांडपट्टा, छडीपट्टा, नेमबाजी, भालाफेक, तलवार इ. शिक्षण घेतले. ब्रिटिशांची राजवट नष्ट करण्यासाठी स्वत: जोतिरांवानी बंडात [ स्वातंत्र्य लढा ] सामील व्हायचे ठरवले. याबाबत वडिलांची परवानगी घेण्याच्या उद्देशाने जोतिराव फुले गेले पण त्याच वेळी गोविंदराव शांतपणे म्हणाले, " जोती तुझी इच्छा चांगली आहे पण इंग्रज बंदूकवाले आहे, हा धाडसी मार्ग मला पसंत नाही. तू आपलं शिक्षण पूर्ण करं [9] " आज्ञाधारक

१०

जोतिरावांनी वडिलांच्या आज्ञेचे पालन केले. शिक्षणाकडे आपले लक्ष केंद्रित केले. त्यांनी १८४७ साली आपला इंग्रजी शाळेचा अभ्यास पूर्ण केला पण इंग्रजांच्याबाबत संतापाची लाट तशीच होती. याच दरम्यान "एके दिवशी दोन इंग्रज सैनिकांनी जोतिरावांच्या संदर्भात अपमानास्पद विधाने उद्गारली. हे प्रकरण तिथेच एकेरीवर आले. रागाच्या भरात व्यायामपटू जोतीने त्या दोघांना जवळच पडलेल्या ऊसाच्या कांडयाने फोडून काढले.[१०] या प्रसंगाविषयी पुढील आयुष्यात लिहिताना " गुलामगिरी " या आपल्या ग्रंथात जोतिरावांनी म्हटले आहे की ब्रिटिशांना हिंदुस्थानातून घालवून देण्याच्या कल्पनांनी आपण भारावून गेलो. आपण इंग्रजांना हाकलून देऊ शकतो याबाबतचा आत्मविश्वास तेव्हापासून जोतिरावांच्या मनात निर्माण झाला होता. त्यांच्या पराक्रमी क्रांतिवादी वृत्तीमध्ये आमूलाग्र भर पडली. समाजसुधारणेसाठी स्वत: काही ठामपणाचे निर्णय जोतिराव घेऊ लागले. सरकारी नोकरी करून इंग्रजांचे बगलबच्चे अथवा गुलाम बनायचे नाही असे त्यांनी ठरविले. लोकसेवा व लोककल्याण हे विचार त्यांच्या मनात घोळत राहिले. याच दरम्यान जोतिरावांच्या मर्मावर घाव घालणारी घटना घडली –

जोतिला एक ब्राह्मण स्नेहयाच्या लग्नाचे आमंत्रण आले. जोतिराव सोहळयास हजर राहिले पण त्या सोहळयातील सनातनी कर्मठ ब्राह्मणांनी कनिष्ठ जातीय जोतिरावांना ओळखले. ब्राह्मणांना ते सहन झाले नाही. कर्मठ ब्राह्मणांनी लग्नसोहळयातील अनेक लोकांसमोर जोतिरावांचा अपमान केला. " अरे शूद्रा, जातीपातीची बंधने झुगारून आमच्या लग्नसोहळयात सामील होतोस काय ? आमचा अपमान करतोस काय ? " या प्रकारच्या अनेक जातीवाचक विधानांनी जोतिरावांचा घोर अपमान करून अक्षरश: लग्नसोहळयातून हकालपट्टी केली.[११] अर्थातच या घटनेमुळे जोतिरावांचे मन पेटून उठले. जातिभेद आणि स्वत:ला भू-देव मानणाऱ्या कर्मठ उच्चवर्णीयांचा सामान्यांवरील अन्याय यामुळे समाजातील पुरोहितशाहीबाबत त्यांच्या मनात तिरस्कार निर्माण झाला. समाजातील जातिभेद नष्ट करण्याचा विचार जोतिरावांच्या मनात घोळू लागला.

सर्व समाजाचे व जातिवर्गांचे त्यांनी सुक्ष्मावलोकन केले. त्यातून त्यांना जाणवले की आपल्या देशबांधवांच्या मनावर अज्ञानाची व बुरसटलेल्या विचारांची पकड बसली होती. ती दूर करण्यासाठी प्रथम सर्व समाज साक्षर आणि सूज्ञ बनवला पाहिजे. यासाठी शिक्षण या माध्यमाचा अवलंब करणे गरजेचे होते. आपले देशबांधव विद्ये अभावी अगदी रसातळाला पोहोचले आहेत, याचीही जाणीव झाली. विद्ये अभावी झालेली दुर्दशा सांगताना जोतिराव म्हणतात -

विद्येविना मति गेली, मतीविना नीति गेली,
नीतिविना गति गेली, गतीविना वित्त गेले,
वित्तविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले.[१२]

सर्व समाज विद्यासंपन्न बनविण्याचे सत्र जोतिरावांनी हाती घेतले. यातूनच खऱ्या अर्थाने जनजागृती होऊ शकेल असा आत्मविश्वास त्यांच्या मनात निर्माण झाला म्हणून जोतिराव म्हणतात --

विद्या शिकताच पावाल ते सुख ।
घ्यावा माझा लेख । जोति म्हणे ।।[१३]

समाजातील पददलित आणि स्त्रीवर्ग साक्षर झाल्यास जनजागृती होऊ शकते अशी ठाम धारणा जोतिरावांना झाली. त्या काळात स्त्रियांची दुर्दशा काही वेगळी होती. मन मानेल तसे वागणाऱ्या पुरूषी सत्तेखाली त्या दबल्या जात होत्या. मानवाला जन्म देणारी माता अशी गुलामगिरीत पिचत पडलेली पाहून जोतिरावांचे मन दुःखी झाले. स्त्रियांना स्वातंत्र्य मिळावे, त्या साक्षर व्हाव्यात अशी तीव्र इच्छा जोतिरावांची होती. माता आपल्या बालकावर चांगल्या प्रकारचे संस्कार करु शकते. मात्र त्यासाठी ती साक्षर असावी. खऱ्या अर्थाने माता हीच जगाच्या उद्धाराची सूप्त शक्ती आहे.

" जिचे हाती पाळण्याची दोरी
ती जगाते उद्धरी ।। "

हे वचन जोतिरावांना पूर्णपणे पटलेले होते. घरातील एक माता शिकून झाली म्हणजे सर्व कुटुंब शहाणे होईल . सर्व स्त्रिया शिकल्या म्हणजे सर्व देश

जागृत होईल. साक्षर मातांचे सुसंस्कार सर्व भारतीयांवर होतील. यामुळेच स्त्रियांना शिक्षण देणे हे पहिले काम जोतिरावांनी हाती घेतले. त्यासाठी अनेक मित्रांचे त्यांनी सहाय्य घेतले. स्वत: अध्यापन करण्याचे ठरविले. शिवाय मदतनीस म्हणून आपल्या पत्नीस साक्षर बनवून अध्यापनाची जबाबदारी सोपविण्याचे ठरवले. प्रयत्नांची पराकाष्ठा करुन समाजाचा विरोध झुगारुन अखेर ध्येयवादी जोतिरावांनी इ.स.१८४८ साली पुण्यातील बुधवार पेठेत चिपळूणकरांच्या भिडे वाड्यात मुलींची पहिली शाळा काढली. या कामी त्यांना रा.जगन्नाथ सदाशिवजी या सद्गृहस्थाने बरीच मदत केली.[१४] ही शाळा केवळ महाराष्ट्रातीलच नव्हे तर भारतातील पहिली मुलींची शाळा ठरली. सुरुवातीस फक्त आठच मुली शाळेत येत असत. अध्यापन कौशल्य व गोडीमुळे शाळेतील मुलींची संख्या वाढू लागली.

अध्यापनाची मक्तेदारी त्यावेळी केवळ ब्राह्मण समाजाकडेच असल्याने त्यांच्याखेरीज अध्यापन करणे पाप समजले जाई. तो अधर्म असून जातीविरुध्द वर्तन होय अशी ओरड सनातनी उच्चवर्णीय करु लागले. त्यांच्या अंगाचा तीळपापड झाला. जोतिराव व सावित्रीबाई या पती-पत्नीने अध्यापनाचे काम निर्धाराने करण्याचे ठरविले. समाजाकडून मात्र प्रचंड मोठा विरोध याबाबत होऊ लागला. सावित्रीबाई शाळेत जाऊ लागल्या म्हणजे ह्या लोकांची टोळकी रस्त्यावर जमत, वाट्टेल ते म्हणत पण या टवाळखोरीकडे, टिंगलटवाळीकडे सावित्रीबाईंनी लक्षच दिले नाही. काही कर्मठांनी तर तिच्यावर चिखलफेक केली. एका कर्मठाने तर एक दिवस सावित्रीबाईंना भरदिवसा रस्त्यात अडवून तिचा विनयभंग करण्याचा प्रयत्न केला. तेव्हा निर्धारी करारी व्यक्तिमत्वाच्या सावित्रीबाईंनी त्याच्या श्रीमुखात भडकावून त्यास आपल्या रस्त्यातून दूर केले. अनेक प्रकारच्या संकटांना तोंड देत त्यांचे विधायक कार्य अखंडपणे चालू होते.

जोतिरावांनी आरंभलेल्या विधायक कार्याचा सुगंध देशभर दरवळला. तत्कालीन सरकारी शिक्षा मंडळाने जोतिरावांच्या शैक्षणिक कार्याकडे सरकारचे लक्ष वेधून घेतले. सरकारतर्फे जोतिरावांचा सत्कार करावा असे सुचविले. ज्ञानप्रकाश

" पुना ऑब्झर्व्हर " या सारख्या वृत्तपत्रांनी त्यांच्या कार्याचे कौतुक करून त्यांची सर्वत्र प्रसिध्दी केली. जोतिरावांचा लौकिक ऐकून पुण्यातील ब्राह्मणांचा जळफळाट होऊ लागला. त्यांनी या विधायक कार्यात विघ्न निर्माण करण्याचे ठरविले. दरम्यान शिक्षा मंडळीने केलेल्या निवेदनाप्रमाणे सरकारतर्फे १६ नोव्हेंबर १८५२ रोजी विश्रामबागवाडा येथे देशी सरदार आणि प्रमुख लोक यांच्या समवेत सत्कार झाला. सत्कार समारंभाचे प्रसंगी पुणे महाविद्यालयाचे तत्कालीन प्राचार्य 'मेजर कॅन्डी' यांनी सरकारी शिक्षा मंडळीचे निवेदन वाचून दाखविलेनंतर सभेचा उद्देश कथन केला. भाषणाच्या शेवटी त्यांना सरकारच्या वतीने एक शाल:जोडी सन्मानपूर्वक अर्पण केली.[१५] या सत्कार समारंभात जोतिरावांची तोंडभर स्तुती करून गौरव करण्यात आला.

## सामाजिक समता - जनक -

देशभर सामाजिक समता आणि बंधुभाव प्रस्थापित करण्यासाठी शिक्षणाचे सार्वत्रिकरण हा एकमेव उपाय आहे याची जाणीव जोतिराव फुल्यांना झाली होती. आपल्या देशातील सहा ते सात करोड लोक विद्ये-अभावी मानवी हक्क गमावून बसले असून शिक्षणाअभावी समाजाची अधोगती होत असल्याची जाणीवही त्यांना झाली होती. मुलींच्या शाळेबाबत त्यांना चांगला पाठिंबा सरकारकडून मिळाला होता. शिवाय काही मान्यवरांनीही आर्थिक सहाय्य केले होते. स्त्रीवर्गाच्या साक्षरतेबरोबरच समाजातील अस्पृश्यांना साक्षर बनवल्यास खऱ्या अर्थाने समाजप्रबोधन होईल आणि अस्पृश्यता दूर होईल असा विचार जोतिरावांच्या मनात आला. पण हे धाडसाचे काम होते. कारण स्त्रिया व अतिशूद्र हे उभयवर्ण ब्राह्मणांच्या मते अपवित्र समजले जात. शूद्रांना विद्येपासून पूर्ण अलिप्त ठेवले होते. एवढेच काय पण शूद्रांना विद्या नसावी म्हणून चांगले मोडी अक्षर लिहिणाऱ्या सोनार प्रभू वगैरे शूद्रजातीच्या लोकांचे पेशवाईच्या रावणीराज्यात हात तोडून टाकण्यात आले होते.[१६] अस्पृश्यांना विद्या शिकविल्याच्या आरोपावरून शेकडो अध्यापकांच्या गळयास फास लावले होते. अशा सामाजिक पार्श्वभूमिवर अस्पृश्यांसाठी शाळा उघडणे फारच धाडसाचे कार्य होते. जोतिरावांनी अघोर धाडस करून इ.स.१८५१ साली निर्धाराने

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

पुण्यातील नाना पेठेत अस्पृश्यांसाठी पहिली शाळा उघडली. यामुळे अर्थातच ब्राह्मण-वर्गात प्रचंड मोठी खळबळ माजली. अस्पृश्यांच्या मुलांनी शाळेत न जाण्याबाबत ब्राह्मणांकडून पालकांना धमक्या देण्यात आल्या. पण जोतिरावांनी महार-मांग वाडयात स्वत: जाऊन विद्यार्थ्यांना जमविण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या विधायक कार्यात विघ्न निर्माण करण्याचा प्रयत्न केले उच्चवर्णीय सातत्याने करीत होते. जोतिरावांनी अस्पृश्यांकरिता शाळा स्थापन केल्यानंतर संतप्त भिक्षुकशाहीने जोतिरावांचे समूळ उच्चाटन करण्याचे ठरविले. एके दिवशी कृष्णभटादि भिक्षुकांनी कपटी डाव रचला. 'धोंडिराम नामदेव कुंभार' व 'रोढे मांग' या मारेक-यांना जोतिरावांचा खून करण्यासाठी पाठविले. मध्यरात्री धारदार शस्त्रे होतात घेऊन जोतिरावांचा नाश करण्यासाठी जाणा-या मारेक-यांचे विचार परिवर्तन झाले. प्राणावरील संकटातून जोतिराव वाचले. पण जो मारेकरी जोतिरावांचा नाश करण्यासाठी आला तोच पुढे त्यांचा एकनिष्ठ अनुयायी बनला. केवळ जोतिरावांच्या प्रेरणेमुळे तो पंडित बनला. व रोढे मांग शरीररक्षक बनला.[१७]

त्यांच्या विधायक कार्याचा गौरव समाजात मोठया प्रमाणावर केला जात असे. पुण्यातील मुलींची व अस्पृश्यांसाठी स्थापन केलेल्या जोतिरावांच्या शाळा झपाटयाने वाढत होत्या. त्या शाळांची तपासणी १२ फेब्रुवारी १८५३ रोजी मोठया लोकसमुदायासमोर झाली. या समुदायास पुणे महाविद्यालयाचे प्राचार्य मेजर कॅन्डी, प्राध्यापक फ्रेझर, सरदार आप्पासाहेब ढमढेरे, प्राध्यापक केरो लक्ष्मण छत्रे, कृष्णशास्त्री चिपळूणकर, जगन्नाथ सदाशिव, बापूराव मांडे इत्यादी मान्यवर लोक हजर होते. या शाळांसाठी मुंबई सरकारचे वकील व न्यायाधीश यांनी प्रत्येकी १०० रु. देणगी दिली. "दक्षिणा पारितोषिक समितीने मासिक ७५ रूपयांचे अनुदान दिले."[१८] रेव्हिन्यू कमिशनर एच्. डब्ल्यू. रिव्हज यांनी मासिक २५ रूपयांची देणगी महारमांग मुलांच्या शाळेसाठी जाहीर केली. जोतिरावांनी चालवलेल्या या कार्याविषयी अनेकांच्या मनात आस्था होती. प्रामुख्याने युरोपियनांनी अधिक आस्था दाखविली. अगदी मोठया ब्राह्मण सहका-यांनी या कामात त्यांना साथ दिली. उत्तरोत्तर जोतिरावांचा

लौकिक वाढू लागला. पण या विधायक कार्यात जोतिराव स्वत:ला वाहून घेत आहेत असे गोविंदरावांना समजताच त्यांनी जोतिरावांची घरातून हकालपट्टी केली होती. तरीही जोतिराव खचले नव्हते. मोठया जोमाने आणि धैर्याने शिक्षण प्रसाराचे आणि दीनदलितांच्या उध्दाराचे कार्य करीत होते.

शिक्षणप्रसाराच्या माध्यमातून स्त्री-शूद्रांना आपल्या हक्काची जाणीव करून देऊन समता आणि बंधुभाव प्रस्थापित करण्याचा जोतिरावांनी प्रयत्न केला. स्त्री-शूद्रांदिंनी साक्षर होण्याबाबतची कळकळ व्यक्त करताना ते म्हणतात -

" दरिद्री मुलांनी विद्येस शिकावे ।।
भिक्षान्न मागावे । पोटापूर्ते ।।
स्त्री-पुरुषांसाठी शाळा त्या घालाव्या ।।
विद्या शिकवाव्या । भेद नाही ।। [१९]

सर्व समाजाचे जोतिरावांनी सुक्ष्मावलोकन केले. शिक्षणप्रसाराचे माध्यमातून सर्वांगीण समाजसुधारणा होईलच असे नाही, म्हणून समाजसुधारकांची संघटना स्थापन करून वेगळीच चळवळ सुरु केली. समतेवर विश्वास घोषित करणारी ही पहिलीच चळवळ होती. यालाच 'सत्यशोधक चळवळ' म्हणून संबोधले.जात होते.

## सत्यशोधक चळवळ -

आधुनिक भारतामध्ये सामाजिक पुनर्घटनेसाठी चळवळ सुरु करणारी पहिली संस्था म्हणजे " सत्यशोधक समाज " होय. या संस्थेने सामाजिक गुलामगिरीविरुध्द आवाज उठवला. यातूनच सामाजिक पुनर्घटनेची मागणी केली. जोतिरावांच्या सामाजिक विचारांचा केंद्रबिंदू म्हणजे मानवाचे नैसर्गिक हक्क हा होता. सत्यशोधक समाजाची चाहूल अप्रत्यक्षरित्या जोतिरावांच्या जाहिर सभा, पत्रके व पुस्तिका याद्वारे लोकांना लागली होती. या चळवळीच्या

माध्यमाने जनजागृतीस चांगलीच गती मिळाली. शेतकरी व कामगारांच्या गा-हाण्याकडे सरकारचे लक्ष वेधावे हा उद्देशही या चळवळीचा होता.

जोतिरावांना शिक्षणप्रसाराची प्रेरणा उच्चवर्णीयांच्या कर्मठपणातून, त्यांना मिळालेल्या अवमानित वागणुकीतून मिळाली. त्याप्रमाणे सत्यशोधक समाजाच्या चळवळीची प्रेरणा ख्रिस्ती धर्मोपदेशकांनी दिली असे म्हटले जाते. पण " जोतिरावांना या संस्थेच्या निर्मितीची प्रेरणा मात्र " वज्रसूची सारखे संस्कृतग्रंथ पठण किंवा कबीरांचा "बीजग्रंथ" विशेषता त्यातील "विप्रमती" हा भाग वगैरे पुस्तकातून मिळाला, ही वस्तुस्थिती आहे." [२०] वज्रसूचीतील जातिभेद विरोधी विचारांना जोतिराव फुले व त्यांचे सत्यशोधक सहकारी प्रभावित झाले. कारण सत्यशोधक समाजाच्या स्थापनेपूर्वी काही महिने जोतिरावांच्या दुकानात स्वत: जोतिराव व त्यांचे काही मित्र दर रविवारी जुन्या ग्रंथाचे वाचन करत असत. अशाप्रसंगी हजर असलेले जोतिरावांचे एक सहकारी " तुकाराम हणमंत पिंगन " यांची साक्ष या दृष्टीने महत्वाची आहे. " ज्ञानगिरी बुवा कबीराने केलेल्या " बीजक" ग्रंथातील "ब्रिजमती" भाग जमलेल्या मंडळीस जोतिराव वाचून दाखवीत. बीजक ग्रंथ बीज भाषेत असल्यामुळे ज्ञानगिरी बुवा मराठीत तर्जुमा करुन मंडळीस सांगत असत. त्यात उच्चवर्णीयांच्या स्वार्थाचे, स्वभाव, वर्तणूक वगैरेचे फार वर्णन आहे, [२१] हा पुरावा सापडतो. कबीराने केलेली उच्चवर्णीयांवरील टीका ऐकून ब्राह्मणांच्याबाबत काही विचार जोतिरावांच्या मनात घोळू लागले. वास्तविक जोतिरावांनी "ब्राह्मण-भट-जोशी" यांच्यावर टीका केली असली तरी ती खा-या अर्थाने ब्राह्मण-जोशीवृत्ती, भटशाही अथवा पुरोहितशाहीवर होती. [२२] यातूनच सत्यशोधक चळवळीस प्रेरणा मिळाली. " समाजातील विषमतेविरुध्द संघर्ष आणि नवसमाजाचे सर्जन अशा या दुहेरी कार्यासाठी जोतिरावांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली." [२३] समाजात हजारो वर्षे घोरात पडलेली, सुस्तावलेली, सामाजिक विषमता नष्ट करणे, त्यातील सत्य शोधून समाजासमोर मांडणे हे सत्यशोधक चळवळीचे कार्य होते. स्वातंत्र्य, समता आणि विश्वबंधुत्व या तत्वाचा अवलंब करुन समाज सुसंघटित करण्याचे व्रत जोतिरावांनी स्वीकारले होते म्हणून ते म्हणतात -

१७

ख्रिस्त-महमंद-मांग-ब्राह्मणांशी ॥
धरावे पोटाशी । बंधुपरी ॥
मानव-भांवडे सर्व एक सहा ॥
त्याच्जमध्ये आहा । तुम्ही सर्व ॥ [२४]

अस्पृश्यांच्या सावलीचा विटाळ समजल्या जाणाऱ्या समाजात त्यांना बंधुप्रमाणे वागणूक मिळावी म्हणून जोतिरावांनी पुण्यातील अस्पृश्यांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मिटवण्याचा प्रयत्न केला. जोतिरावांनी इ.स. १८५१ साली आपल्या विहिरीवर आणि गंजपेठेतील आपल्या पाणी भरण्याच्या हौदावर पाणी भरण्याची जाहीर परवानगी अस्पृश्य समाजाला दिली. या प्रकारच्या उपक्रमाच्या माध्यमातून सामाजिक समता प्रस्थापित करण्यास शुभारंभ केला. कर्मठ उच्चवर्णीयांनी आणि धर्मपंडितांनी धर्माच्या नावाखाली सामान्य समाजावर खूपच अन्याय केला. सामान्य समाज या गुलामगिरीमधून मुक्त होऊन बंधुभावाची कल्पना मांडताना जोतिराव म्हणतात -

" धर्मराज्य भेद मानवा नसावे ।
सत्याने वर्तावे इशासाठी ॥

मानव जातीमध्ये भेदाभेद नसावेत म्हणून जोतिराव अखंडपणे झटत होते. सत्यशोधक समाजाची स्थापना करण्यापूर्वी स्त्रियांवरील अन्याय निवारण करण्यासाठी जोतिरावांनी विविध उपक्रम राबवले होते. शिवाय विधवा स्त्रियांना रूढी-परंपरेमुळे खूपच छळले जात होते. अर्थातच विधवा स्त्रियांचा प्रश्न सोडविण्यासाठी जोतिरावांनी पुढाकार घेतला.

विधवाविवाह व अनाथाश्रम :

महाराष्ट्रामध्ये विधवांच्या पुनर्विवाहासाठी १८४० सालापासून प्रचार सुरु झाला. "पुण्यातील विष्णूशास्त्री बापट नावाचे एक गृहस्थ हे विधवा-विवाहाचे आदय प्रचारक होते. इ.स. १८४२ मध्ये दोन ब्राह्मण विधवांचा पुनर्विवाह बेळगांवमध्ये झाला." [२५] या घटनेपासून विधवा विवाहास खऱ्या अर्थाने

चालना मिळाली. पण समाजातील अनेक कर्मठांनी खूप मोठा गहजब माजवला. पण बाळशास्त्री जांभेकर, लोकहितवादी यासारख्या सुधारकांनी विधवा स्त्रियांना दास्यमुक्त करण्यासाठी अहोरात्र प्रयत्न केले. इ.स. १८५१ मध्ये तर हिंदू समाजाची अपूर्व सभा झाली. या सभेमध्ये हिंदू- विधवांच्या पुनर्विवाहाबाबत कडाक्याचा वादविवाद झाला. अखेर सनातनी कर्मठांनी ही सभा मोडून काढली. सुधारक आणि सनातनी यामध्ये कठोर विरोध झाला. सनातनीपेक्षा सुधारक नेहमीच अल्पमतात असल्यामुळे सनातन्यांचा वरचष्मा असे. विधवा-विवाहाबाबत एवढा गदारोळ असून देखील अखेर " २५ जुलै १८५६ मध्ये विधवा विवाहाचा कायदा हिंदी सरकारने संमत केला. तसेच ब्रिटिश लोकसभेमध्ये इ.स. १८५७ मध्ये घटस्फोट देण्याचा स्त्रियांचा हक्क मान्य केला." [२६]

जोतिरावांनी स्त्री-मुक्ती कार्याला प्राधान्य दिले होते. "जोतिरावांनी विधवा विवाह प्रौढ-विवाह, पतिता-परित्यक्ता त्यांचे बिकट व नाजुक प्रश्न, अनाथालये या सर्व क्षेत्रात स्वतः पुढाकार घेऊन प्रत्यक्ष कार्य केले." बरेचसे विधवा विवाह त्यांनी घडवून दाखविले होते. " शेणवी जातीतील एका विधवेचा शेणवी विधुराशी ८ मार्च १८६० रोजी पुण्यात पुनर्विवाह घडवून दाखविला." [२७]

विधवांच्या पुनर्विवाहाबाबत लोकहितवादी अविरतपणे झटले. ते म्हणतात, " विधवांचे पुनर्विवाह करू नयेत असे ब्राह्मणांनी आपल्या हितार्थ शास्त्र बनविले. विधवा स्त्रिया व्यभिचार करतील म्हणून त्यांचे केस काढून बोडक्या करण्याचे शास्त्र केले. म्हणजे त्यांना कोणी पुरुष अनुकूल होणार नाही." [२८] याप्रमाणे विधवा स्त्रियांची कुचंबना केवळ ब्राह्मण-वर्गाने केली. लोकहितवादींच्या मते विधवांच्या पुनर्विवाहास समाजाने संमती द्यावी असे अनेकांना वाटत असते पण प्रत्यक्ष त्यांचे आचरण करण्यास कोणी धजत नाही. पण याबाबत ज्यांची अनुमती आहे त्यांची एक प्रजाच होऊ शकेल. ही पुनर्विवाह करणारी एक जात उभी राहिली पाहिजे, पुनर्विवाह हिंदू लोकांच्या सुधारणेचे मूळ आहे. ते सहजसाध्य आहे. समाजात या पध्दतीस सुरूवात करून दिली पाहिजे.

विशेषत: ब्राह्मण लोकांच्या विधवा पाहून फार वाईट वाटते. ब्राह्मणांच्या घरी एक तरी विधवा असतेच. स्वत:च्या माता-बहिणींची या रूढीमुळे विटंबना करण्यास हा ब्राह्मण समाज कुचरत नाही. हाच त्या समाजाचा दैवदुर्विलास आहे. तरुण विधवांकडून नाईलाजाने ब-याचवेळा व्यभिचार होतात. अनैतिक संबंधामुळे आपल्या देहात वाढणा-या बालकाची या विधवा हत्या करून स्वत:ची अब्रू वाचविण्याचा प्रयत्न करतात. पण ब-याच वेळा या घटना उघडकीस येतात. " इ.स. १८८१ मध्ये गुजरातमधील विजयालक्ष्मी नावाच्या विधवेने भ्रूणहत्या केल्यामुळे समाजाकडून तिचा खूप छळ झाला. शिवाय तिला शिक्षा झाली. समाजात तिची बेअब्रू झाली. "[२९] अशाप्रकारची त्यांची कुचंबणा व छळ करण्यापेक्षा विधवा पुनर्विवाह रूढ करणे केव्हाही चांगले.

जोतिराव फुल्यांनी विधवा विवाहाची समस्या सोडविण्यासाठी एक युक्ती केली. कारण विधवांशी होणा-या अनैतिक संबंधातून जन्मणा-या बालकांचे प्रमाण वाढत होते. बालहत्या मोठया प्रमाणावर होत असे. काही व्यभिचारी विधवा स्वत:चे पापकृत्य लपविण्यासाठी आत्महत्या करत होत्या. म्हणून अशा स्त्रियांना आश्रय देऊन त्यांच्या बालकांचे संगोपन करण्याचे ठरवले. यासाठी त्यांनी एक संस्था स्थापन केली. " जोतिरावांनी इ.स. १८६३ साली आपल्या घराशेजारी स्वत:च्या खर्चाने एक वाडा बांधला. त्यास ३८५ हा घर नंबर दिला हेच त्यांचे "बालहत्या प्रतिबंधक गृह " होय. संपूर्ण पुणे शहरात या बालहत्या प्रतिबंधक गृहाची प्रसिध्दी केली."[30] "विधवांनी गुप्तपणे येऊन जोतिरावांच्या बालहत्या प्रतिबंधक गृहात बाळंत होऊनजावे." अशा मोठया अक्षरातील पाटया पुण्यात ठिकठिकाणी लावल्या. त्यामुळे काही सनातन्यांची माथी भडकली. पण लोकहितवादी, भांडारकर, रा.ब.मदन श्रीकृष्ण, रा.नवरंगे, रा. परमानंद, तुकारामतात्या पडवळ या सद्गृहस्थांनी जोतिरावांना मदत केली. " जोतिरावांचे हे बालहत्या प्रतिबंध गृह स्थापन झाल्यामुळे पुण्यातील ३०-४० अर्भके काळाच्या दाढेतून बचावली. पण पुढे त्यातील बहुतेक मुले जास्त दिवस जगली नाहीत. या बालहत्या प्रतिबंधक गृहात

काशिबाई नावाच्या ब्राह्मण विधवेच्या पोटी इ.स.१८६५ साली जोतिरावांचे दत्तकपुत्र "यशवंतराव" याचा जन्म झाला. विधवांच्यादृष्टीने ही संस्था श्रेष्ठ आश्रयस्थान होती. जोतिराव व सावित्रीबाई फुले दोघेही अनाथ बालकांचे वात्सल्याने लालनपालन करीत असत. जोतिरावांनी हे कार्य अखंडपणे चालविले. त्यांची परंपरा न्या.रानडे, लालशंकर उमीशंकर यासारख्या मित्रांनी पुढे चालविली.[३१] "

समाजात समता, स्वातंत्र्य आणि विश्वबंधुत्व प्रस्थापित करण्यासाठी जोतिरावांनी विविध उपक्रम राबविले. हजारो वर्षे दडपल्या गेलेल्या दीन-दलितांची गा-हाणी, दुःख, आशा-आकांक्षा यांना जोतिरावांनी सत्यशोधक चळवळीच्या रूपाने वाचा फोडली. " जातिभेद निर्मूलन, परमेश्वर-भक्त यांच्यातील दलाल नष्ट करणे, ब्राह्मणेतरामध्ये शिक्षण प्रसार, त्यांच्यासाठी सरकारकडून नोक-या या चार उद्देशाने सत्यशोधक चळवळीच्या रूपाने समाजाची स्थापना पुणे येथे केली.[३२]" पुण्यात २४ सप्टेंबर १८७३ रोजी आपले सर्व चाहते व अनुयायी यांच्या समवेत जोतिराव फुल्यांनी एक सभा बोलविली. महाराष्ट्रातील विविध केंद्रातून सुमारे ६० कार्यकर्ते जमले होते. आपल्या प्रभावी भाषणाने जोतिरावांनी आपल्या अनुयायांना चळवळीचा उद्देश व महत्व पटवून सांगितले. या चळवळीचे पहिले अध्यक्ष व कोषाध्यक्ष म्हणून जोतिरावांची निवड झाली. या संस्थेचे सभासद होताना प्रत्येकाला शपथ घ्यावी लागे. महाराष्ट्रात अनेक ठिकाणी सत्यशोधक समाजाच्या शाखा स्थापण्यात आल्या. मानवाची धार्मिक गुलामगिरीतून मुक्तता हा एकमेव उद्देश डोळ्यासमोर ठेऊन सर्व समाजात सर्वधर्म समभाव या तत्वाचा अवलंब करण्यात आला. " याच दरम्यान प्रार्थनासमाज, ब्राह्मोसमाज, आर्यसमाज या प्रकारच्या विविध चळवळी निर्माण झाल्या. महाराष्ट्रात हा बंडाचा झेंडा प्रार्थना समाजाने दबकत-दबकत उभारला तर फुले यांनी 'सर्वसाक्षी जगत्पती त्याला नको मध्यस्ती " असा उद्घोष करीत सत्यशोधक समाजाचा झेंडा आघाडीवर आणला.[३३] " जोतिराव फुल्यांचे अनुकरण करून न्या.रानडे, भांडारकर, सर नारायण चंदावरकर यांनी प्रार्थना समाजाची स्थापना केली. राजा राममोहनरॉय यांनी 'ब्राह्मोसमाज' स्थापन केला तर

स्वामी दयानंद सरस्वती यांनी आर्यसमाजाची मुहूर्तमेढ रोवली. हे सर्व केवळ जोतिराव फुल्यांच्या सत्यशोधक समाजाच्या प्रेरणेमुळे, सर्वांनी त्यांचे अनुकरण करुन सर्वत्र समता, बंधुभाव प्रस्थापित होऊ लागला. पण अनेक कर्मठांनी या विधायक कार्यात विघ्न निर्माण करण्याचा प्रयत्न केला. सत्यशोधक समाजाचे कोणीही सभासद होऊ नये म्हणून कर्मठ उच्चवर्णीय लोक धमकावणी देऊ लागले. त्या धमकावणीला न जुमानता समाजप्रबोधनाचे कार्य विविध उपक्रम हाती घेऊन जोमाने सुरु झाले.

पुरोहितवर्गाशिवाय सत्यशोधक समाजाच्या पध्दतीनुसार विवाह संपन्न करुन ब्राह्मण, पुरोहिताच्या परंपरेस या चळवळीने प्रथम शह दिला. या तत्त्वानुसार सत्यशोधक समाजाने पहिला विवाह दि. २८ डिसेंबर १८७३ रोजी संपन्न केला. यामुळे पुरोहितवर्ग संतप्त झाला. त्यांच्या प्रतिष्ठेला आणि कमाईला तडा गेला. त्यांच्या कोणत्याही दबावाला बळी न पडता जोतिरावांनी सत्यशोधक समाजाच्या पध्दतीनुसार " ज्ञानोबा ससाणे " नावाच्या गृहस्थाचा विवाह ठरविला. पुरोहितवर्गाकडून ससाणेवर खूपच दबाव आला. जोतिरावांनी ससाणेस खंबीर पाठिंबा दिला. शेवटी बंदोबस्ता-मध्ये ससाणेचा विवाह जोतिरावांच्या घरी दि.७ मे १८७४ रोजी झाला.[३४]" " सत्यशोधक पध्दतीच्या विवाह विधीच्या रुपाने जुन्या रुढी परंपरेस तिलांजली दिली. सत्यशोधक समाजाच्या अनुयायांसाठी जोतिरावांनी सुटसुटित विवाह विधी तयार करुन दिला. त्यातील धार्मिकता वैयक्तिक स्वरुपाची होती."

स्त्री-शूद्रांच्या उध्दाराबरोबरच समाजातील कनिष्ठवर्ग, शेतकरी व कामगार यांच्या उध्दाराचेही कार्य सत्यशोधक समाजाने अंगीकारले होतेच. शेती आणि शेतक-यांच्या सुधारणेबाबतचे पर्याय जोतिरावांनी मांडले. समाजातील विविध घडामोडी व घटनांतून त्यांना समाजप्रबोधनाची आपोआप प्रेरणा मिळत गेली. एकेक उपक्रम हाती घेत, विविध संस्था निर्माण करत जोतिरावांनी समाजप्रबोधनाचे कार्य अखंडपणे चालू ठेवले. सामान्यावर होणारा अन्याय यास पुरोहितशाही कारणीभूत आहे असा ठाम विश्वास जोतिरावांचा

होता. कारण याच वर्गाने मन मानेल तसे ग्रंथ लिहून त्याचे आचरण केले. सर्वत्र धर्मांधता बोकाळली असल्याने समाजाची सर्व घडी विस्कळीत झाली होती.

धार्मिक विचार -

समाजसुधारणेसाठी जोतिरावांचे सर्वतोपरी प्रयत्न सुरु होते. धार्मिक सुधारणा हीच ख-या अर्थाने सामाजिक सुधारणा होऊ शकते याची जाणीव फुल्यांना झाल्याने हिंदुधर्माचे मूळ शोधण्याचा प्रयत्न त्यांनी केला. काही घटनाद्वारे जोतिरावांना हिंदुधर्म चिकित्सेची प्रेरणा मिळाली. प्र.के.अत्रे फुल्यांच्या धार्मिक चिकित्सेच्या प्रेरणेबाबत मत मांडताना म्हणतात, " फुल्यांचे गुरु 'परशुरामभाऊ पटवर्धन', त्यांच्या कन्येला नवव्या वर्षी वैधव्य आल्यामुळे तिचे केशवपन करुन तिला विद्रूप केले. या घटनेमुळे फुल्यांच्या मनाला धक्का बसला. असे अघोरकृत्य करावयास " धर्माची आज्ञा " हे एकमेव कारण असल्याचे त्यांच्या गुरुंच्या तोंडून ऐकल्यानंतर धर्माविषयी सत्यशोधन करण्याची प्रेरणा फुल्यांच्या मनात जागृत झाली.[३५] मानवामध्ये जातिभेदाचे प्रचंड मोठे स्तोम धर्मसंस्थेनेच माजवले. खुद्द जोतिरावांनाही जातिभेदाचे दाहक चटके बसले होते. " सखाराम परांजपे " नावाच्या ब्राह्मण मित्राच्या लग्नातून हकालपट्टी करण्यात आली. हिंदुधर्मातील अनिष्ट व जाचक रुढी सर्व समाज सहन करत होता. फुल्यांना इतर धर्मातील तत्वप्रणालीचाही अभ्यास करावयाचा होता.

ख्रिस्ती धर्माची तत्वे जोतिरावांच्या मनावर बालपणापासून बिंबलेली होती. " गरीबांवर दया करणे, जातीचा विचार न करता ज्ञानदान करणे, मुलींच्या आणि पददलित जातीच्या शिक्षणासाठी खास करुन प्रयत्नशील असणे, या मिशन-यांच्या गुणांचा प्रभाव महात्मा फुले यांच्यावर होताच." ख्रिस्ती धर्मप्रसारकांनी अनेक हिंदुधर्मियांना धर्मांतरास प्रवृत्त केले. समाजसुधारणेचे अनेक उपक्रम राबविले. आपल्या कार्याने मिशन-यांनी ब्राह्मणोत्तर जातीतील अनेक विचारवंतांना व कार्यकर्त्यांना प्रभावित केले. अर्थातच अनेकांनी ख्रिस्तीधर्म

स्वीकारला. पण हे धर्मांतर घडवून आणताना मिशन-यांनी बुरसटलेल्या ब्राह्मणी विचारप्रणालीला धक्के दिले. यामुळे अनेक हिंदुधर्मियांनी ख्रिस्ती धर्माचे स्वागतच केले. ज्या धर्माच्या छत्राखाली माणसाला माणूस म्हणून वागविले जाते असा धर्म जोतिराव शोधत होते. हिंदुधर्मातील विषमतेवर आधारलेली तत्वप्रणाली अखंड माणूसकीलाच लाजविणारी होती. पूजाविधी, व्रत-वैकल्ये या माध्यमाने समाजाची लूट होत होतीच. शिवाय माणूस म्हणून जन्मलेल्या अस्पृश्य लोकांचा अनन्वित छळ केला जात होता. धर्माच्या तत्वाप्रमाणे त्यांना गावकुसाबाहेर राहणे, उष्टेमाष्टे खाणे, हीन कामे करणे, प्रसंगी कुत्र्या मांजराप्रमाणे मार खाणे, रस्त्यावर थुंकी न टाकणे, स्वत:च्या पावलाचे ठसे खराटयाने पुसणे, गावबंदी, मंदिर प्रवेश बंदी, सार्वजनिक विहिरीवर पाणी भरणेस बंदी, रोटी-बेटी, लोटा बंदी, यासारखे हीन दर्जाचे जीवन जगावे लागत होते. या सर्वास कारण हिंदुधर्माची तत्वप्रणाली, मनुस्मृतीच्या दहाव्या अध्यायात अस्पृश्यांनी कसे वागावे ? याची तत्वे लिहिली असल्याने त्यांचा समाजाकडून छळ होत असे. त्यामुळे जी हिंदुधर्माची तत्वे लोकांना अन्यायकारक वाटत होती. त्या तत्वांना कंटाळून अनेकांनी ख्रिस्ती, बौध्द धर्म स्वीकारला.

धार्मिक सुधारणेच्या उद्देशाने याच दरम्यान प्रार्थना समाजाची स्थापना झाली होती. अर्थात ब्राह्मोसमाजाचा आदर्श प्रार्थना समाजाने समोर ठेवलाच होता. परमेश्वर एकच आहे, तो सर्वशक्तीसंपन्न असून सर्वांचा पालनकर्ता आहे. तो कधीही अवतार धारण करीत नाही. त्याने कोणताही धर्मग्रंथ तयार केलेला नाही. परमेश्वरास अर्पण केलेला नैवेद्य त्यास पोहोचत नाही पण मनोभावे केलेले ईशचिंतन हीच त्याची पूजा व नैवेद्य होय. अशा प्रकारची तत्वप्रणाली निर्माण करुन ब्राह्मोसमाज व प्रार्थना समाज उजळ माथ्याने वावरण्याचा प्रयत्न करीत होता. पण जोतिरावांनी सुक्ष्मावलोकन करुन त्यातील ब्राह्मघोटाळा जाणून घेतला. कारण हिंदुधर्माची पडझड सावरण्यासाठी तत्कालीन सनातन्यांची ही बचावात्मक केविलवाणी धडपड होती. म्हणून फुल्यांना प्रार्थनासमाजाविषयी विश्वास वाटला नाही. पण मुसलमान धर्मातील तत्वप्रणाली जातिभेदाचा समूळ नाश करणारी, बंधुभावाने

वागणारी, सर्वांचा निर्माण कर्ता एक मानणारी, असल्याने जोतिरावांना आदरणीय वाटली. अर्थात जोतिरावांना मुसलमान व ख्रिस्ती धर्माबाबत आणि त्यातील तत्वप्रणालीबाबत परमावधीचा आदर होता. त्याचप्रमाणे हिंदुधर्माबाबत मनात द्वेष होता पण हिंदुधर्माच्या सुधारणेसाठी जोतिरावांनी खूप प्रयत्न केले. लोकहितवादींनीही जोतिरावांना धर्मसुधारणेच्या कामात खूप सहकार्य केले. त्यांनी धर्म सुधारणेची काही कलमे सांगितली. त्यामध्ये ईश्वरावर श्रध्दा, सहकार्य भावना, व्यक्तिस्वातंत्र्य, स्त्रीपुरूष समान हक्क, जातिभेद नष्ट करणे इ. कलमांचा अवलंब केल्यास समाजात समता, बंधुभाव प्रस्थापित होईल. हिंदुधर्मसुधारणेबाबत अनेकांनी चिंतन केले. जोतिरावांच्या विचारसरणीला मिळतीजुळती मते अनेकांची होती. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हिंदुधर्माबाबत म्हणतात, हिंदुधर्मावर जगणारा पुरोहितवर्ग या धार्मिक गोंधळास कारणीभूत आहे. या वर्गाने मांडलेल्या गोंधळातून मुक्त होण्यासाठी जांभेकर लोकहितवादी, फुल्यासारख्यांनी परखड टीका केली. हिंदुधर्मास काहीजण बेवारशी धर्मशाळेची उपमा देतात. " हिंदुधर्मास उपमा द्यावयाची झाल्यास ती एखाद्या बिनवारशी धर्मशाळेची दिली तर योग्यच ठरेल. या धर्मशाळेत बेजबाबदार वृत्ती बोकाळली आहे. कोणीही दरिद्री मनाने केव्हाही यावे, आपला तवता सुभा थाटावा. स्वातंत्र्याच्या नावाखाली इतरांना शिव्याशाप द्यावयात. एक दिवस आपले चंबुगबाळे आटोपून निघून जावे. इतका बेजबाबदार धर्म विज्ञानयुगात प्रगत झालेल्या देशातही शोधून सापडणार नाही. "[३६] अशाप्रकारची टीका या धर्माबाबत केली जाते म्हणूनच फुल्यांनी सर्वसमावेशक नवीन धर्म स्थापन केला. तोच " सार्वजनिक सत्यधर्म " होय. अथांग मानवजातीबाबतची करूणा हेच या धर्माचे मूळ आहे. या धर्म-कल्पनेचा पाया शुध्दबुध्दीवाद आहे. एकेश्वरवादाची कल्पना सोडल्यास जोतिराव पूर्ण बुध्दीवादी वाटतात.

जोतिरावांनी आपल्या जीवनाच्या अंत्यकाळी " सार्वजनिक सत्यधर्म " हे छोटेसे पुस्तक लिहिले. मानवांची ती एक प्रकारची आचारसंहिताच आहे.

प्रदीर्घ चिंतनाने जोतिरावांनी सार्वजनिक सत्यधर्माची तत्वप्रणाली शब्दबध्द केली. फुल्यांनी १८८९ मध्ये जरी हे पुस्तक लिहिले तरी त्यातील तत्वप्रणाली बाबतचे चिंतन १८७३ पासून त्यांच्या मनात सुरु होते. सर्वत्र विश्वबंधुत्वाची कल्पना प्रस्थापित करण्यासाठी जोतिराव " सार्वजनिक सत्यधर्म " मध्ये म्हणतात,

" मानवाचा धर्म एकच असावा ।
सत्याने वर्तावा । जोती म्हणे ।। "

हजारो वर्षे चालत आलेल्या धर्मतत्वाच्या प्रवाहाविरुध्द जाऊन जोतिरावांनी समाजप्रबोधन केले. त्यांची ही कामगिरी महाराष्ट्रालाच नव्हेतर सर्व हिंदुस्थानाला मार्गदर्शक ठरणारी आहे असे प्र.के.अत्रे आपले मत मांडतात.[३७]

जोतिरावांचा ईश्वराच्या अस्तित्वावर दृढ विश्वास होता. धर्म आणि ईश्वर यांची कुठेतरी सांधेजोड असावी असे त्यांना वाटत होते. म्हणून जीवनसरणीत त्यांनी धर्माला अग्रस्थान दिले. धर्मचिंतन हा त्यांच्या जिव्हाळ्याचा विषय बनला. धर्मचिकित्सेतूनच त्यांची वाङ्:मय निर्मिती झाली. " सार्वजनिक सत्यधर्म " हा त्यांचा शेवटचा ग्रंथ असून त्यामध्ये ईश्वर, पूजा, नामस्मरण, नैवेद्य, अन्नदान, अनुष्ठान, स्वर्ग, स्त्री-पुरुष, पाप-पुण्य, जातिभेद, नीती, धर्म, दैव, सत्य, आकाशातील ग्रह, लग्न, मृत्यू, प्रेताची गती, श्राध्द, अशाप्रकारच्या अनेक विषयांचा समावेश आहे. या सर्व विषयाचे स्पष्टीकरण संवादात्मक पध्दतीने केले आहे. एक धर्म व एकेश्वरवादी जोतिरावांनी बहुदेवतावादी, विषमता जोपासणा-या हिंदुधर्मावर टीका करुन आपला सत्यधर्म समाजासमोर मांडला.

धार्मिक सुधारणेतून दीनदलितांच्या उध्दारासाठी सर्वस्वाचा त्याग करणा-या जोतिरावांचा लोकसमुदायातर्फे सत्कार करण्याचे ठरले. जोतिरावांच्या चळवळीतील कार्यकर्त्यांनी व चाहत्यांनी समाजातील प्रतिष्ठीत व्यक्तींना आमंत्रण देऊन त्यांच्या सत्काराचा दिवस ११ मे १८८८ ठरवला. मांडवी येथील कोळीवाडा

सभागृहात त्या दिवशी अपूर्व गर्दी जमली. अनेकांनी स्फूर्तिदायक भाषणे करुन जोतिरावांच्या कार्याबाबत कृतज्ञता व्यक्त केली. अखेर टाळयांच्या गगनभेदी कडकडाटात जोतिरावांना जनतेतर्फे " महात्मा " ही पदवी बहाल केली. ही पदवी सामान्य जनतेने स्वयंस्फूर्तीने दिली होती. जोतिरावांच्या सामाजिक आणि वाङ्:मयीन कार्याप्रित्यर्थ्य जनतेने त्यांना दिलेली ही पदवी महान आणि दुर्मिळ स्वरुपाची ठरते. त्यांनी आपली कार्यपरंपरा वाङ्.मयाच्या माध्यमातून अखंडपणे चालविली. कारण त्यांच्या साहित्यातून कोणत्याही सुहृदयशील वाचकास समाजप्रबोधनाची प्रेरणा मिळू शकते. एवढे सामर्थ्य त्यांच्या साहित्यग्रंथात आहे. आपले विचारप्रणाली पटावेत म्हणून त्यांनी काव्याचा अवलंब केला. पवाडे, मंगलाष्टके, आरत्या अखंडादी काव्यातून समाजाच्या मनावर आपली विचारप्रणाली बिंबवली. त्यांच्या वाङ्:मयातून जीवनाचे तत्वज्ञान प्रकट होते.

महाराष्ट्रातील सुप्रसिध्द साहित्यिक डॉ. वि.भी.कोलते फुल्यांच्या वाङ्:मयाबाबत म्हणतात,-

"जोतिरावा फुल्यांच्या वाङ्:मय-सेवेकडे मराठी साहित्य-सेवकांचे जसे जास्त लक्ष जायला पाहिजे तसे अद्याप गेलेले दिसत नाही. सरस्वतीच्या मंदिरात त्यांना बहुमानाची जागा मिळवून देण्याइतकी त्यांची वाङ्:मय सेवा श्रेष्ठ आहे."

महर्षि शिंदे त्यांच्या वाङ्:मयाला रानफळाची उपमा देतात. ते म्हणतात - " जोतिरावांच्या वाङ्:मयात कला नसेल पण त्यात अंतरीचा जिव्हाळा आहे. त्यात व्याकरणाचे नियम नसतील पण माणुसकीची धारणा आहे. या रानफळाच्या वासाने हजारो वर्षांच्या गुलामगिरीच्या अंधारात झोपी गेलेला बहुजन समाज खडबडून जागा झाला म्हणूनच जोतिरावांची "रांगडी मराठी भाषा" वाचकांना जिव्हाळयाची वाटते." त्यांच्या काव्यातील विशेषत: अखंड रचनेतील साधीसोपी पण परखड भाषा वाचकाच्या अंत:करणाला जाऊन भिडते. गुलामगिरीच्या अंधारात झोपणा-याला खडबडून जागृत करते. फुले यांच्या प्रत्ययकारी काव्य संपदेचे स्वरुप - सामर्थ्य व समाज प्रबोधनवादी तत्वप्रणाली पुढील प्रकरणात पाहू.

## प्रकरण १ ले

### संदर्भ सूची


| | | |
|---|---|---|
| १. | मा.स.बागल | सत्यशोधकांना इशारा किंवा नव्या पिढीचे राजकारण, आ.५ , पृ.४८. विजयी मराठा, पुणे |
| २ | विद्यासेवक | डिसें., १९३५, अंक ४ था, पृ.५०. |
| ३ | धनंजय कीर | म.जोतिराव फुले, आ.२ ,मुंबई ३४, पृ.०५. [१९६३] |
| ४ | तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी | हिंदूधर्म समीक्षा आणि सर्वधर्म समीक्षा, आ. – ,पृ.१२७. |
| ५ | डॉ.स.ग.मालशे धनंजय कीर(संपादक) | म.फुले समग्र वाङ्मय, आ.१, मुंबई ३२, १९६९, पृ.४७५ |
| ६ | धनंजय कीर | उनि, पृ.१३ |
| ७ | तत्रैव | पृ.१५ |
| ८ | तत्रैव | पृ.१८ |
| ९ | ए.के.घोरपडे | म.जोतिराव फुले, आ. – ,पृ.९७ |
| १० | धनंजय कीर | उनि., पृ.१७ |
| ११ | तत्रैव | पृ.२० |
| १२ | डॉ.स.ग.मालशे धनंजय कीर | उनि. पृ.१८९ |
| १३ | ए.के.घोरपडे | उनि.पृ.३० |

| | |
|---|---|
| १४ पं.सि.पाटील | म.जोतिराव फुले (यांचा अल्प परिचय ) आ.२ ,मुंबई ३२, पृ.११ |
| १५ धनंजय कीर | उनि.पृ.५० |
| १६ पं.सि.पाटील | उनि.पृ.१७ |
| १७ धनंजय कीर | उनि पृ.८७ |
| १८ तत्रैव - पृ.४५ | |
| १९ डॉ.स.ग.मालशे धनंजय कीर (संपा.) | उनि पृ.४४९ |
| २० य.दि.फडके | व्यक्ती आणि विचार, आ.१ , पुणे ३०,पृ.४२ |
| २१ तत्रैव - पृ.४३ | |
| २२.मा.पा.मंगुडकर | म.फुले आणि सत्यशोधक चळवळ, आ ., पृ.८ |
| २३ पी.बी.साळुंखे | म.फुले गौरव ग्रंथ, आ. १ ,मुंबई-३२,पृ.२०४ |
| २४ डॉ.स.ग.मालशे धनंजय कीर | उनि.पृ.४४९ |
| २५ धनंजय कीर | उनि पृ.९६ |
| २६ तत्रैव - पृ.९७ | |
| २७ तत्रैव - पृ.९८ | |
| २८ अ.का.प्रियोळकर | लोकहितवादीकृत निबंध संग्रह, आ.२ ., पृ.३५ |
| २९ डॉ.स.ग.मालशे (संपा.) | स्त्री पुरुष तुलना आ.२ , पृ.४ [प्रस्तावना] |
| ३० धनंजय कीर | उनि पृ.९८ |
| ३१ प.सि.पाटील | उनि पृ.२४ |

| | |
|---|---|
| ३२ डॉ.एस.जी.कुलकर्णी | राजा शाहू आणि समाज प्रबोधन, |
| | आ.-., पृ.१०१. |
| ३३ पी.बी.साळूंखे(संपा.) | उनि पृ.३८३ |
| ३४ धनंजय कीर | उनि पृ.१५१ |
| ३५ प्र.के.अत्रे | जोतिराव फुले, |
| | आ.-, पृ.०५ |
| ३६ जयसिंगराव बाबूराव राणे | सत्यशोधक समाज, |
| | (दिवाळी अंक १९७१ ) पृ.१७ |
| ३७ प्र.के.अत्रे | उनि पृ.८ |


••